## सूर्यकुमार यादवची फटकेबाजी सुरूच; गुवाहाटीतही बरसला



**गुवाहाटी :** सध्या सूर्यकुमार यादवची त्सुनामी आली आहे. त्याने फॉर्म पुढे सुरू ठेवत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात अर्धशतक पूर्ण केले. सुर्यकुमारने १८ चेंडूंत ५४ धावा ठोकल्या. त्याचबरोबर भारताने २०० धावा पूर्ण केल्या. आफ्रिकेचा असा एकही गोलंदाज नव्हता की त्याला भारतीय फलंदाजांनी चोपले नाही. केएल राहुल (५७) आणि सूर्यकुमार यादवनंतर विराट कोहलीही आपले अर्धशतक केले असते, मात्र त्याला शेवटच्या षटकात चेंडू खेळण्याची संधी मिळाली नाही. त्याने २९ चेंडूंत ४९ धावा केल्या. सुरुवातीला कर्णधार रोहित शर्मानेही (४३) चांगले योगदान दिले, तर दिनेश कार्तिकच्या शेवटच्या षटकातील आतषबाजीने भारत २३७ धावांपर्यंत पोहचला. त्याने सात चेंडूंत १७ धावा केल्या. विजयासाठी दक्षिण आफ्रिकेला २३८ धावांचे आव्हान होते.


सोमवार, ३ ऑक्टोबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक ७६

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


### अंतरंग


लाइफलाइन एक्स्प्रेसचा हजारो रुग्णांना दिलासा/२

पनवेलमध्ये पाणीबचतीबाबत मार्गदर्शनपर व्याख्यान/३

महाड शहरात पाणीटंचाई; भाजपकडून टँकरद्वारे पुरवठा/७




# मुख्यमंत्र्यांना जीवे मारण्याची धमकी

## पोलिसांकडून एकाला लोणावळ्यातून अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याचा कट रचला असल्याची पोलीस नियंत्रण कक्षास खोटी माहिती देणाऱ्या एकावर लोणावळा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अविनाश आप्पा वाघमारे (वय ३६, रा. घाटकोपर, मुंबई) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. त्याला अटक करण्यात आली आहे.

महिनाभरापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याचे पत्र मंत्रालयात त्यांच्या कार्यालयात आले होते. नक्षलवाद्यांकडून पाठविण्यात आलेल्या या पत्रात त्यांच्यासह कुटुंबीयांना जीवे मारण्याची किंवा जीवघेणा हल्ला होऊ शकतो अशी धमकी देण्यात आली आहे. त्यानंतर रविवारी (दि. २) निनावी फोन आला. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान आणि त्यांच्या कुटुंबीयांची सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे.

दरम्यान, पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गालगत वळवन येथे असलेल्या हॉटेल साई कृपा येथे पाण्याच्या बाटलीची किंमत जास्त लावल्याचा राग मनात धरून अविनाश वाघमारे याने मॅनेजर व कर्मचाऱ्यांना धडा शिकविण्याच्या उद्देशाने दारूच्या नशेत आपल्या मोबाइलवरून पोलीस नियंत्रण कक्षास १०० नंबरवर कॉल केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याचा प्लॅन चालू आहे ही खोटी माहिती पसरवली. पोलिसांना खोटी माहिती देऊन यंत्रणेची धावपळ उडवणाऱ्या अविनाश वाघमारेवर लोणावळा शहर पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

# विजयादशमीला भ्रष्टाचाराच्या भस्मासुराचे दहन करणार

### भाजप नेते किरीट सोमय्या यांचे प्रतिपादन; पनवेलमध्ये नवरात्रोत्सवात गरबाप्रेमींसह धरला ठेका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**विजयादशमीला रावण दहनासोबतच महाराष्ट्राला जो शाप आहे त्या भ्रष्टाचारी भस्मासुराचेदेखील दहन करणार असल्याचे भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी म्हटले आहे. ते पनवेलमध्ये आयोजित नवरात्रोत्सवात शनिवारी (दि. १) बोलत होते.**





भाजप नेते किरीट सोमय्या यांनी शनिवारी रात्री पनवेलमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळ आयोजित झंकार नवरात्रोत्सवाला भेट दिली. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह मित्र मंडळाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी सोमय्या यांनी गरब्याच्या तालावर ठेका धरला. एवढ्यावरच न थांबता रंगमंचावर येऊन वाद्यवृंदासोबत ड्रमसेट वाजविण्याचाही आनंद लुटला. **(पान २ वर.)**

# आदित्य ठाकरेंना धक्का; वरळीतील शिवसैनिकांचा शिंदे गटात प्रवेश



**मुंबई :** शिवसेनेच्या ठाकरे गटाला मुंबईच्या वरळीत मोठा धक्का बसला आहे. वरळीतील शेकडो शिवसैनिकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय निवासस्थान 'वर्षा'वर शिंदे गटात प्रवेश केला आहे. कार्यकर्त्यांचा हा प्रवेश युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरेंना मोठा धक्का मानला जात आहे.

दसरा मेळाव्याच्या काही दिवसांआधीच वरळीतील कार्यकर्त्यांनी ठाकरे गटाची साथ सोडली आहे. आदित्य ठाकरे वरळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. बालेकिल्ल्यातच शिवसैनिकांनी साथ सोडल्यानंतर आदित्य यांची पुढील वाटचाल कठीण मानली आहे.



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..





अधिक छायाचित्रे पान ३ वर..

# प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

### गव्हाण, मोर्बे, नेरे येथे उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ आणि भारतीय जनता पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ऑक्टोबर रोजी खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. या महाशिबिराच्या अनुषंगाने तालुक्यातील मोर्बे, गव्हाण आणि नेरे येथे रविवारी (दि. २) प्राथमिक तपासणी शिबिर झाले. या उपक्रमास भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली.

भाजपच्या वतीने सेवा पंधरवड्यानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत होणाऱ्या महाशिबिराच्या अनुषंगाने मोर्बे येथील डांगर्णेश्वर मंदिर सभागृह, गव्हाण ग्रामपंचायत हॉल व नेरे येथील समित्र गणेश उत्सव मंडळाच्या सभागृहात प्राथमिक तपासणी शिबिर झाले. **(पान २ वर.)**

# सेवा पंधरवड्यानिमित्त पनवेलमध्ये नमो प्रदर्शनी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी कृतित्व, व्यक्तित्व व जनकल्याणकारी योजनांवर आधारित एकदिवसीय नमो प्रदर्शनी पनवेलमध्ये रविवारी (दि. २) आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमास नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित या नमो प्रदर्शनीचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक अनिल भगत, एकनाथ गायकवाड, बबन मुकादम, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील, भाजपचे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, संजीव कुलकर्णी, अमोल खेर, शहर संयोजक निखिल गोरे, वैभव बुवा, साई निकाळजे, रोहित पाटील, कौस्तुभ सोमण यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नमो प्रदर्शनीची पाहणी करीत उत्तम आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. **(पान २ वर.)**

## निवडक

### मुलायमसिंहांची प्रकृती बिघडली; आयसीयूत उपचार

**गुरूग्राम :** समाजवादी पक्षाचे अध्यक्ष मुलायमसिंह यादव यांची तब्येत बिघडल्याचे समोर आले आहे. काही दिवसांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना गुरूग्राममधील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रकृती खालावल्याने त्यांना रविवारी (दि. २) अतिदक्षता विभागात (आयसीयू)मध्ये हलवण्यात आले आहे.

### पुण्याच्या चांदणी चौकातील वाहतूक ११ तासांनी पूर्ववत

**पुणे :** येथील चांदणी चौकातील पूल



रविवारी (दि. २) मध्यरात्री स्फोटके व अन्य यंत्रणांद्वारे पाडण्यात आला. त्यानंतर ११ तासांनी बाह्यवळण मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. पूल पाडण्यासाठी ६०० किलो स्फोटकांचा वापर करण्यात आला. या भागातील राडारोडा हटवून सकाळी १० वाजता वाहतूक सुरू करण्यात आली.

## जेएनपीए बंदरात अडीच कोटींचे रक्तचंदन जप्त

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

जेएनपीए बंदरातून दुबईतील जेबेल अली बंदरात निर्यात करण्यात आलेल्या संशयित कंटेनरमधून अडीच कोटींचे तीन मेट्रीक टन रक्तचंदन जप्त करण्यात आले आहे. जेएनपीए सीमा शुल्क विभागाने ही कारवाई केली.

जेएनपीए बंदरातून दुबईत निर्यात करण्यात येत असलेल्या मालाच्या कंटेनरबाबत सीमा शुल्क विभागाला संशय होता. त्यामुळे या विभागाच्या गुन्हे पथकाने हा कंटेनर दुबईतून परत मागविला. या कंटेनरची तपासणी करण्यात आली असता यामध्ये सुमारे तीन मेट्रीक टन रक्तचंदन आढळले आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

### नवरात्रोत्सव विशेष

## भातसई येथील महादेवी



**रोहे : महादेव सरसंबे**

रोहे तालुक्यातील भातसई येथील महादेवी मातेच्या मंदिरात नवरात्रोत्सव विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांनी साजरा होत आहे. अत्यंत श्रद्धेने या देवीचे भाविक दर्शन घेताना दिसत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या अवचितगडाच्या पायथ्याशी अनेक पुरातन मंदिरे आहेत. त्यातीलच एक भातसई येथील श्री महादेवी माता मंदिर होय. या मातेचा उत्सव मंदिरात मोठ्या उत्साहात सुरू आहे.

निसर्गाच्या कुशीत वसलेले टुमदार भातसई गाव रोहा-अलिबाग मार्गावर आहे. गावातील श्री महादेवीचे देवस्थान जागृत आहे. **(पान २ वर..)**





# सचिन वाझे हे उद्धव ठाकरेंचे कार्यकर्ते

## ऑन रेकॉर्डचा उल्लेख करीत भाजप नेते आशिष शेलारांचा आरोप

**बुलढाणा : प्रतिनिधी**

शिंदे गटाचे खासदार प्रतापराव जाधव यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप केला आहे. 'मातोश्री'वर दर महिन्याला १०० खोके पाठवले जात होते, असा गौप्यस्फोट त्यांनी केला आहे. ते बुलढण्यात 'हिंदू गर्व गर्जना' कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करीत होते.

या वेळी त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली असून सचिन वाझे हे दर महिन्याला





मातोश्रीवर १०० कोटी रुपये पाठवत होते, असे जाधव म्हणाले. प्रतापराव जाधवांच्या टीकेनंतर भारतीय जनता पार्टीचे नेते आशिष शेलार यांनीही उद्धव ठाकरेंवर आरोप केले आहेत. सचिन वाझे हे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे कार्यकर्ते होते, हे कागदोपत्री स्पष्ट झाले आहे, असं आशिष शेलार म्हणाले. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी हे विधान केले आहे.

प्रतापराव जाधवांनी केलेल्या आरोपांवर भाष्य करताना आशिष शेलार म्हणाले, सचिन वाझे हे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे कार्यकर्ते होते, हे स्पष्ट झाले आहे, हे ऑन रेकॉर्ड आहे. सचिन वाझे यांना पुन्हा पोलीस दलात जेव्हा घेण्यात आले, त्यावेळी कुणी दबाव टाकला होता? कुणी विशेष प्रयत्न केले होते? हेही न्यायालयाच्या रेकॉर्डवर आहे. दोन्ही गोष्टी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना घडल्या असून यामध्ये उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा हात दिसतोय. त्यामुळे परिस्थितीजन्य पुरावे पाहता प्रतापराव जाधवांनी दिलेल्या माहितीला बळ मिळतंय, अशी प्रतिक्रिया आशिष शेलारांनी दिली आहे.

### शिवसेनेच्या दसरा मेळाव्यावरही टीका

***शिवसेनेच्या दसरा मेळाव्यावरही भाजप नेते अशिष शेलार यांनी खोचक शब्दात टीका केली आहे. शेलारांनी काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेचा संदर्भ देतो शिवसेनेला खोचक टोला लगावला आहे, त्यांनी लिहिले आहे की, काँग्रेसच्या भारत जोडोला पेंग्विन सेनेची साथ, दसरा मेळाव्याच्या गर्दीसाठी काँग्रेस देणार हात! सगळा गोंधळ घालून, घड्याळ बघा कसे नामानिराळे, संसार तिघांचा, प्रगती पाळणा मात्र राष्ट्रवादीचा हले.... महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना या तिन्ही पक्षांवर त्यांनी टीका केली आहे.***

# भाजप प्रदेशाध्यक्षांच्या हस्ते 'धन्यवाद मोदीजी' अभियानाचा शुभारंभ



**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्य लोकांसाठी केलेल्या योजनांचा लाभ झालेल्या राज्यातील लाभार्थ्यांशी संपर्क साधून त्यांच्या हस्ताक्षरात लिहिलेली १५ लाख पत्रे पंतप्रधानांपर्यंत पोहचविण्याचे भारतीय जनता पक्षाचे धन्यवाद, मोदीजी अभियान रविवारी सुरू झाले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या अभियानात मुंबईत गोरेगाव मतदारसंघात ५० लाभार्थ्यांशी संपर्क साधला.

बावनकुळे यांनी पत्रकारांना अभियानाची माहिती दिली. या वेळी पक्षाच्या सेवा पंधरवडा अभियानाचे प्रमुख प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश ठाकूर, उपाध्यक्ष कृपाशंकरसिंह, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, स्थानिक आमदार व माजी राज्यमंत्री विद्या ठाकूर, धन्यवाद मोदीजी अभियानाच्या संयोजक प्रदेश सचिव श्वेता शालिनी आणि सहसंयोजक हर्षल विभांडिक उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सामान्य लोकांसाठी थेट लाभाच्या अनेक योजना सुरू केल्या व त्यांची यशस्वी अंमलबजावणी केली. घरकूल, शौचालय, वीज कनेक्शन, गॅस कनेक्शन, शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये, कोरोनाकाळात मोफत धान्य अशा विविध योजनांचे राज्यात पाच कोटी लाभार्थी आहेत. पहिल्या टप्प्यात त्यापैकी १५ लाख लाभार्थ्यांशी भाजपाचे कार्यकर्ते संपर्क साधणार असून त्यांच्या हस्ताक्षरातील पत्रे घेणार आहेत. लाभार्थ्यांकडून गोळा केलेली अशी पंधरा लाख पत्रे १५ नोव्हेंबरला नवी दिल्ली येथे पाठविणार आहे. ते म्हणाले की, राज्यातील सर्व ९७ हजार बूथमध्ये हे अभियान राबविण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू केलेल्या या अभियानात पक्षाचे सर्व मंत्री, खासदार, आमदार, पदाधिकारी सहभागी होणार आहेत.

कार्यकर्ते पाच घरांमध्ये लाभार्थ्यांशी संपर्क साधून त्यांच्या हस्ताक्षरातील पत्रे घेणार आहे. अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२४पर्यंत राज्यातील किमान दोन कोटी लाभार्थ्यांशी संपर्क साधण्याचे उद्दीष्ट आहे. एखाद्या घरात पात्र व्यक्तीला योजनेचा अजून लाभ मिळाला नसल्याचे आढळले तर त्यांना तो लाभ मिळवून देण्यासाठीही काम करतील, अशी माहिती त्यांनी दिली.

## ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करणारा पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

ज्येष्ठ नागरिकाजवळचे दागिने लुबाडून रिक्षातून पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या त्रिकुटांपैकी एका तोतया पोलिसाला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना नवीन पनवेल भागात घडली.

अली जाफरी (३७) असे तोतया पोलिसाचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याला पोलीस बतावणी केल्याप्रकरणी अटक केली, तसेच पळून गेलेल्या त्याच्या इतर दोघा साथीदारांचा शोध केला आहे. नवीन पनवेलमधील विचुंबे भागात राहणारे शरद कांबळे (६०) हे सेवानिवृत्त झाले असून त्यांना कामानिमित्त मुंबईत जायचे होते. त्यासाठी ते पनवेल रेल्वे स्टेशन येथे पायी जात होते. या वेळी त्यांच्याजवळ आलेल्या दोघा भामट्यांनी स्पेशल पोलीस असल्याचे, तसेच पुढे चेकिंग सुरू असल्याचे सांगत कांबळे यांना अंगावरील दागिने काढून ठेवण्यास सांगितले. हातातील अंगठी काढल्यानंतर दोघा भामट्यांनी कांबळे यांना बोलण्यात गुंतवून दागिने कागदात बांधून ठेवण्याचा बहाणा करून ते स्वतःकडे घेतले. हा प्रकार त्या भागातील एका जागरूक नागरिकाच्या लक्षात आल्यानंतर त्याने आरडाओरड केली. त्यामुळे दोघा भामट्यांनी जवळच उभ्या असलेल्या रिक्षामध्ये बसून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र त्या भागात जमलेल्या नागरिकांनी अली जाफरीचा हात पकडून त्याला खाली ओढले.

त्याचे दोघे साथीदार कांबळे यांचे ६० हजार रुपये किमतीचे दागिने घेऊन रिक्षामधून पळून गेले.

## पाटनोली येथे आज महायज्ञ सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागृत श्री तुळजाभवानी मातेचा नवरात्रौत्सवामध्ये सोमवारी महायज्ञ सोहळा (दि. ३) सकाळी ९:३० ते १२:३० व नंतर १२:३० पुर्णाहुती व महाआरती होऊन महाप्रसाद होईल.

श्री क्षेत्र पाटनोली येथील श्री श्री राधागोपालनाथ संत वामनभाऊ, संत भगवानबाबा संस्थान येथे होणाऱ्या या यज्ञ सोहळ्यामध्ये सर्व जोडप्यांना सामील होता येईल. सोन्याफ्रेंन्डस् हलगी ग्रुप-सातारा यांचे हलगी वादन होईल. या कार्यक्रमाचे निमंत्रक भागवताचार्य ह.भ.प. महेश महाराज साळुंखे आणि भक्त परिवार आहे. सर्व धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहिून लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



**पनवेल : शिवप्रेमी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोमटणे व पनवेल विभागातर्फे श्री दुर्गामाता दौड काढण्यात आली. स्वतःसाठी तर सगळेच जगतात, पण देव, देश, धर्मासाठी तेच जगतात ज्यांचे आदर्श श्री छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज असतात. हीच भावना समाजातील जनमानसात रूजावी म्हणून केलेले प्रयत्न म्हणजे श्री दुर्गामाता दौड होय, असे आयोजकांनी या वेळी सांगितले.**

### पान १ वरून

## विजयादशमीला भ्रष्टाचाराच्या भस्मासुराचे दहन करणार

पनवेलमध्ये एवढा भव्यदिव्य दांडिया फक्त आणि फक्त आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर हेच आयोजित करू शकतात, असे सांगत किरीट सोमय्या यांनी नवरात्रोत्सवाच्या आयोजनाबद्दल कौतुक केले तसेच दोन वर्षांनी दांडिया खेळून मला खूप आनंद झाला, तुम्हालाही मजा आली ना, असे म्हणत त्यांनी उपस्थितांशी रंगमंचावरून संवाद साधला.

## प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

या विविध शिबिरांना भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, ओबीसी सेल अध्यक्ष एकनाथ देशेकर, जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, वाकडीचे माजी सरपंच नामदेव जमदाडे, नरेश पाटील, वावंजेचे माजी सरपंच प्रकाश खैर, नितळसचे माजी सरपंच कैलास मढवी, आंबेचे माजी सरपंच तुकाराम पाटील, संतोष आगलावे, दीपक बोडे, रामदास म्हात्रे, जनार्दन भगत, रमेश नावडेकर, बाळाराम उसाटकर, एकनाथ नाईक, दिनेश फडके, पिंटू म्हात्रे, लक्ष्मण पाटील, तुकाराम पाटील, अंकेश पाटील, रवी पाटील, चांगो चौधरी, चिंध्रणच्या सरपंच कमला देशेकर, महाळुंगी ग्रामपंचायतीच्या सदस्य निलम अरिवले, नितळसचे उपसरपंच भार्गव मढवी, नेरे ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री म्हसकर, माजी सरपंच वासुदेव गवते, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश गडगे, एकनाथ पाटील, वर्षा पाटील, युवा मोर्चा नेरा जि. प. विभागीय अध्यक्ष सागर पाटील, चिंचवली माजी सरपंच रमेश पाटील, कोप्रोली माजी सरपंच रमेश पाटील, डॉ. रोशन पाटील, राम पाटील, तेजस जाधव, जगदिश म्हसकर, माजी सरपंच जयंत मानकामे, हेमंत मानकामे, मिलिंद पाटील, अमित गवते, किशोर खारके, संतोष चोरगे, शैलेश जाधव, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, हेमंत ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, माजी उपसरपंच भाऊशेठ पाटील, वसंतशेठ पाटील, प्रमोद कोळी, सुनील कोळी, परशुराम कोळी, गणेश पाटील, देवेंद्र म्हात्रे, सुधीर ठाकूर, ज्योत्स्ना ठाकूर, परशुराम वास्कर, व्ही. के. ठाकूर, सदा ठाकूर, कैलास कोळी, कामिनी कोळी, उषा देशमुख, अमित कोळी, अनंता ठाकूर, महादेव कोळी, विजयकुमार राठोड, स्वाती नाईक, डॉ. नगराळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

आरोग्य महाशिबिरात सर्वसाधारण रोग, महिलांचे आजार, हृदयरोग, हाडांचे रोग, मधुमेह, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, हिमोग्लोबिन, बालरोग, त्वचा व गुप्तरोग तपासणी, दंतरोग तपासणी, नाक-कान-घसा, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, कॅन्सर तपासणी, क्षयरोग तपासणी आणि औषधोपचार मोफत देण्यात येणार आहे. त्याचबरोबर आयुष्यमान भारत डिजिटल कार्डसुद्धा या शिबिरात तयार करून देण्यात येणार आहेत. या महाशिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत व सचिव परेश ठाकूर यांनी केले आहे.

## सेवा पंधरवड्यानिमित्त पनवेलमध्ये नमो प्रदर्शनी

देशाला जगात ताकदवान बनविण्याचे काम करणारे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणासाठी वचनबद्ध आहे. ते अंत्योदयाचा संकल्प देत देशातील गोरगरीब, शोषित व वंचित वर्गाच्या कल्याणाकरिता देशसेवेचे ध्येय साध्य करीत विविध जनकल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी समर्पित भावनेने कार्यरत असतात. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत सेवात्मक, रचनात्मक, व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व अशा विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नमो प्रदर्शनी भरविण्यात आले. या प्रदर्शनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावर तसेच योजनांवर आधारित चित्र स्वरूपात माहिती उपलब्ध करून देण्यात आली होती. पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी याचा लाभ घेत आयोजकांना धन्यवाद दिले.

## भातसई येथील महादेवी

या देवीबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. गावातील गुराखी आपल्या गुरांना चारण्यासाठी घेऊन गेला असता एका करवंदीच्या झुडपापाशी अवतरलेली देवी दिसली. नंतर ती अदृश्य झाली आणि पुन्हा सध्याच्या देवळाजवळ माळावर प्रकट झाली. गावकऱ्यांनी १९०७मध्ये महादेवीचे नवीन मंदिर श्रमदानातून बांधले. चैत्र पौर्णिमेला देवीची पारंपारिक वाद्यवृंदाच्या साथीने पालखी काढली जाते. गळटोचणीचा कार्यक्रम हा या यात्रेचे मुख्य आकर्षण आहे.

# जासई विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सोहळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई येथे शुक्रवारी (दि. ३०) सभेचे आयोजन करण्यात आले होते.



सर्वप्रथम महापुरुषांच्या तसेच लोकनेते दि. बा. पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी अण्णांच्या जीवनावर काढलेल्या रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पोर्ट विभाग नवी मुंबईचे सहायक पोलीस आयुक्त धनाजी शिरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर कर्मवीर अण्णा व रयत माऊली तसेच लोकनेते दि. बा. पाटील साहेबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या उपस्थितीत सभेस प्रारंभ झाला. या वेळी व्यासपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माध्यमिक रयत शिक्षण संस्था सातारा सहसचिव राजेंद्र साळुंखे, प्रमुख वक्ते विभागीय अधिकारी, र. शि. सं. सातारा लाईफ मेंबर चंद्रकांत जाधव, सहा. विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, विद्यालयाचे चेअरमन अरुणशेठ जगे, शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष व कामगार नेते सुरेश पाटील, सभापती नरेश घरत, जासईचे सरपंच संतोष घरत, विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे सर्व सदस्य, पालक वर्ग उपस्थित होते.

कॉलेजचे प्रा. ए. आर. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, कामगार नेते तसेच भारतीय मजदुर संघाचे महामंत्री सुरेश पाटील यांची दिल्ली येथे शासकीय पोर्ट केंद्रीय वेतन करारावर निवड झाल्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. डी. आर. ठाकूर यांना रायगड भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग यांना राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य आचार्य शिरोमणी पुरस्कार तसेच आंतरराज्य प्राचार्य गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यालयाकडून सन्मानित करण्यात आले. पायगोंडा देवगोंडा पाटील पुरस्काराने सन्मानित विद्यालयाच्या आदर्श विज्ञान शिक्षिका एस. सी. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थिनी तृप्ती मनोहर चाटे हिने अण्णांच्या कार्याची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रयत सेवक संघाचे समन्वयक व ज्येष्ठ शिक्षक नूरा शेख यांनी केले. आभाप्रदर्शन गुरुकुल विभागप्रमुख जी. आर. म्हात्रे यांनी केले.

## कारची कंटेनरला धडक

**पनवेल :** खांदेश्वर येथे एका हुंडई कारची कंटेनरला पाठीमागून धडक बसली. अपघातात जीवितहानी टळली आहे, मात्र कारचे नुकसान झाले आहे. कर्नल इघ सक्सेना (वय ७१, रा. हडपसर, पुणे) हे आपल्या हुंडई कार (एमएच १२ टीएन ५३८१) घेऊन पुणेवरून मुंबईकडे जात असताना खांदेश्वर परिसरात त्यांचा गाडीवरील ताबा सुटून तिसऱ्या लेनवरून जाणारा कंटेनर (एमएच ४६ एआर ४५२०)ला पाठीमागून धडक दिली. अपघातामध्ये कोणालाही दुखापत नाही, मात्र कारचे नुकसान झाले आहे. महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे पोलीस उपनिरिक्षक गणेश बुरुकुल आणि स्टाफ यांनी तत्काळ अपघाताच्या ठिकाणी जाऊन वाहतूक सुरळीत केली.



# लाइफलाइन एक्स्प्रेसचा हजारो रुग्णांना दिलासा

## रायगड जिल्ह्यातील अनेकांवर मोफत उपचार व यशस्वी शस्त्रक्रिया

**पाली : प्रतिनिधी**

अद्ययावत सेवासुविधा व तज्ञ डॉक्टरांचा समावेश असलेली लाइफलाइन एक्स्प्रेस माणगाव तालुक्यातील गोरेगाव रेल्वेस्थानकावर मागील १५ दिवस उभी होती. रायगड जिल्ह्यातील हजारो नागरिकांनी या मोफत उपक्रमाचा उपचार घेतला. अनेकांची यशस्वी शस्त्रक्रियादेखील झाली.



इम्पॅक्ट इंडिया फाउंडेशन, महानगर गॅस, भारतीय रेल्वे आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने लाइफलाइन एक्स्प्रेस सुरू करण्यात आली आहे. १५ ते ३० सप्टेंबरदरम्यान ही ट्रेन गोरेगाव स्थानकात उभी होती. यासाठी जिल्हा परिषद सीईओ डॉ. किरण पाटील व प्रशासनाचे विशेष सहकार्य लाभले.

यामध्ये डोळ्यांचे परीक्षण व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, कानाचे विकार असलेले रुग्ण परीक्षण व शस्त्रक्रिया, स्त्रीरोग उपचार, स्तन व गर्भाशय ग्रीवा कॅन्सर परीक्षण, दातांचे परीक्षण व उपचार, १४ वर्षाखालील मुलांच्या वाकड्या पायांची तपासणी व शस्त्रक्रिया, फाटलेले ओठ तसेच भाजलेल्या शरीरावरील परीक्षण व शस्त्रक्रिया अशा विविध आरोग्य सुविधांचा लाभ नागरिकांना मोफत देण्यात आला, अशी माहिती लाइफलाइन एक्स्प्रेस तसेच इम्पॅक्ट इंडिया फाउंडेशनचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सौरभ गुरव यांनी दिली.

इम्पॅक्ट इंडिया या संस्थेचा हा प्रकल्प १९९१ साली सुरू झाला. केंद्र सरकार व विशेषतः भारतीय रेल्वे विभागाच्या उत्तम सहकार्याने ही आरोग्य ट्रेन देशभर जाऊन काम करीत आहे. यामध्ये प्रशिक्षित २५ जणांचा स्टाफ व इतर मदतीसाठी स्थानिक ४० माणसे आहेत.

ट्रेनच्या दोन डब्यांत दोन ऑपरेशन थेटर, दातांच्या उपचारासाठी एक डबा आहे. त्याचप्रमाणे इतरही सेवासुविधा उपलब्ध आहेत.

### असे झाले उपचार

**या हॉस्पिटल ट्रेनमध्ये १५ दिवसांत ४,३३० रुग्णांनी नोंदणी केली. ३२० प्लॅस्टिक शस्त्रक्रिया झाल्या. लहान मुलांच्या हाडांच्या ११ शस्त्रक्रिया झाल्या. कानाच्या ४१, मोतीबिंदूच्या २६० आणि इतर सात शस्त्रक्रिया झाल्या, तसेच ३६५ जणांच्या दातांवर विविध उपचार करण्यात आले.**

# पनवेलमध्ये पाणीबचतीबाबत मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवा पंधरवड्यानिमित्त भाजप पनवेल श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जली ही जीवन या मोहिमेंतर्गत रविवारी (दि. २) मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाले असून, बृहन्मुंबई महापालिकेच्या पर्यावरण विभागा निवृत्त उपायुक्त सुप्रभा मराठे यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते




उद्घाटन झाले.

यांच्या प्रमुख उपस्थितीत रेन वॉटर हार्वेस्टिंग फॉर लाईफ लाईव्हलिहुड या विषयावर मार्गदर्शन पर व्याख्यान झाले. या वेळी पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारोह झाला. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहराध्यक्ष जयंत पगडे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, बबन मुकादम, समीर ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, रामशेठ ठाकूर पब्लीक स्कूलच्या मुख्याध्यापीका राज अलोनी, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, रविदास पाटील, सुमीत झुंजारराव यांच्यासह पनवेल महापालिका परीक्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष, सचिव व पदाधिकारी यासोबत शाळा महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.







**पनवेल : सेवा पंधरवड्यानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ आणि भाजप यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ऑक्टोबर रोजी खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. या महाशिबिराच्या अनुषंगाने तालुक्यातील मोर्बे, गव्हाण आणि नेरे येथे रविवारी प्राथमिक तपासणी शिबिर झाले. या उपक्रमास भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## पनवेल शहर डॉक्युमेंटरीचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहराला ऐतिहासिक वारसा आहे, अशा या शहराला जुने पनवेल किंवा ओल्ड पनवेल म्हणू नका तर पनवेल शहर असा याचा उल्लेख करा यासाठी पनवेल शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने या मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. आजूबाजूंच्या शहरांना नवी ओळख मिळत असताना मग मला जुने पनवेल का बरं म्हणावे माझ्या आजूबाजूला उपनगरीय विस्थापित होत असताना किंवा नवीन शहर उदयास येत असताना मला आनंद होतोय, परंतु माझ्या नावापुढे जुने पनवेल किंवा ओल्ड पनवेल लावल्याने मला वेदना होत आहेत अशी आशियाची एक डॉक्युमेंटरी शनिवारी (दि. १) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे या मोहिमेला मार्गदर्शन मिळाले आहे. मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंजारराव आणि मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने सुरू करण्यात

आलेल्या या मोहिमेला पनवेलकर प्रचंड प्रतिसाद देतील, अशी आशा सुमित झुंजारराव यांनी या वेळी व्यक्त केली आहे.

पनवेल शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटीच्या मैदानावर सुरू असलेल्या झंकार दांडिया नवरात्र उत्सवाच्या कार्यक्रमात मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनीही या मोहिमेचे मनापासून स्वागत करून या मोहिमेत पनवेलकरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

या कार्यक्रमाला उद्योजक विलास कोठारी, प्रशांत पोतदार, जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, प्रशांत झुंझारराव, माजी नगरसेवक राजू सोनी, रोशन ठाकूर, प्रवीण मोरबाळे, अमेय देशमुख आदी उपस्थित होते.

## नवरात्रोत्सवानिमित्त करंजाडेत विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप व श्री. सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक संस्था करंजाडे यांच्या वतीने सार्वजनिक नवरात्रोत्सवचे आयोजन करंजाडे सेक्टर ४ येथे करण्यात आले आहे. या वेळी उरणचे आमदार महेश बालदी यांनी देवीचे दर्शन घेतले. मंडळाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच नवरात्रोत्सवानिमित्त महिलांसाठी पैठणी व मंगळागौरी यांसह इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष मंगेश शेलार यांनी केले. या नवरात्रोत्सवात गरबा नृत्य करणाऱ्यांना विविध बक्षीस देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

या वेळी भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, सागर आंग्रे, नंदू भोईर, शिवाजी शेलार, अतिश साबळे, बळीराम म्हात्रे, मनीष कटेकर, सत्यजित पाटील, विशाल पाटील, गणेश मोरे, सागर कदम आदी उपस्थित होते.







**पनवेल : कल्पतरू सोसायटी आयोजित दांडिया उत्सवाची चित्रमय झलक.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)



**पनवेल : सेवा पंधरवड्यानिमित्त भाजपच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका महिला मोर्चाच्या वतीने स्थानिक उत्पादने व व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी व्होकल फॉर लोकल शीर्षकाखाली शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या विविध वस्तू एकदिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले होते. या उपक्रमाला भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली.**




**पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी वलप येथील हिल व्ह्यूव सोसायटीच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवास भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप वलप अध्यक्ष प्रभाकर पाटील, युवा कार्यकर्ता संजोग पाटील, अंकुश पाटील, चंद्रकांत पाटील, प्रतिक पाटील, नवनाथ खुटारकर, राजेश पाटील, सम्राट पाटील, परेश पाटील, जगन्नाथ पाटील, स्वामी पाटील, सागर पाटील, प्रताप पाटील, श्रीकांत लोखंडे, बबलू यादव, प्रशांत शिंदे, धीरेन्द्रकुमार झा, विठोबा लाड, विशाल लाड, गिरीश शेट्टी, शामचल ठाकूर, संजय पवार, सचिन जाधव, विशाल सोनावणे, प्रतीक सावंत, दीपरंजन दास, ज्ञानेश्वर गोरुले, केशव सोनावणे, अखिलेश नायर, सौरभ फाठक, अतुल काणेकर, सत्यजित साहू आदी उपस्थित होते.**



**कळंबोली : येथे स्थानिक रिक्षा चालक मालक संघटनेच्या रिक्षा स्टॅण्डचे उद्घाटन भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप शहर मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, भाजप भटके-विमुक्त सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, अजिंक्य तारा मित्र मंडळाचे अध्यक्ष व आयोजक सित्तू शर्मा, प्रमोद पाटील, राजबीर चौधरी, नवीन मेनन, बिट्टू लॉरेन्स आदी उपस्थित होते.**




**पनवेल : भाजप झोपडपट्टी सेल सहसंयोजक अशोक आंबेकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : कराडे खुर्द ग्रामपंचायतीमध्ये महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी केळवणे जि. प. विभागीय अध्यक्ष किरण माळी यांनी अभिवादन केले.**



**पनवेल : जय भवानी, सवणे यांच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे व केळवणे जि. प. विभागीय अध्यक्ष किरण माळी, भारत देशमुख यांनी देवीचे दर्शन घेतले.**

## संपादकीय

# स्वदेशी तंत्रज्ञान क्रांती

फाईव्ह जी इंटरनेट सेवेच्या शुभारंभाने भारताच्या आगामी वाटचालीच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. या तंत्रज्ञानाचा फायदा केवळ दूरसंचारच नव्हे; तर शिक्षण, आरोग्य, कृषी यांसारख्या क्षेत्रांनाही होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ५जी सेवेचा शुभारंभ करण्यात आला असून हळूहळू या सेवेचे जाळे देशभर विस्तारणार आहे.

**आगामी काळ हा तंत्रज्ञानाचा असणार आहे. तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात आधीच खूप प्रगती झाली असून येत्या कालावधीतही तंत्रज्ञान परिवर्तन घडवून आणणार आहे. या पार्श्वभूमीवर भारताने ५जी सेवेचा शुभारंभ करून नवा इतिहास रचला आहे. गेल्या काही दिवसांपासून देशभरात ५जीची चर्चा सुरू होती. केंद्रीय दूरसंचारमंत्री अश्विनी वैष्णव यांनी देशात लवकरच ही सेवा सुरू होणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार राजधानी दिल्लीतील प्रगती मैदानावर शनिवारी झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या सेवेचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी पंतप्रधानांनी ५जी सेवेचे महत्त्व अधोरेखित केले. त्याचप्रमाणे नवभारताच्या वाटचालीचा आढावा घेतला. २जी, ३जी, ४जीच्या काळात भारत तंत्रज्ञानासाठी इतर देशांवर अवलंबून होता, पण ५जी ही स्वदेशी बनावटीची प्रणाली आहे. त्यामुळे २१व्या शतकातील भारतासाठी १ ऑक्टोबर २०२२ हा ऐतिहासिक दिवस आहे, ज्याची नोंद इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांत होईल. या नव्या स्वदेशी यंत्रणेमुळे नव्या युगाची पहाट झाली आहे, असे पंतप्रधान या वेळी म्हणाले. त्यांनी पुढे बोलताना आज १३० कोटी भारतीयांना ५जीच्या रूपाने एक अद्भूत भेट मिळत आहे. ही अनेक संधींची सुरुवात आहे, असे सांगून यासाठी देशवासीयांचे अभिनंदन केले. याअगोदर देशाला बाहेरून मोबाइल आयात करावे लागत होते, पण आता देश मोबाइल निर्यात करीत आहे. मोबाइल निर्मिती करण्यात भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. आत्मनिर्भर भारताने हे करून दाखवले आहे, याकडे पंतप्रधान मोदींनी लक्ष वेधले. ते जे म्हणाले ते खरेच आहे. आपला देश पूर्वी अनेक गोष्टींसाठी इतरांवर अवलंबून होता. त्यामुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात विविध गोष्टींची निरनिराळ्या देशांमधून आयात करावी लागत होती. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून चित्र बदलले. त्यांनी आत्मनिर्भर भारत अभियानाची घोषणा करून शेती, उद्योग, व्यवसायांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे अनेक उत्पादनांची भारतात निर्मिती होऊ लागली. अगदी काही दिवसांपूर्वी आयएनएस विक्रांत या युद्धनौकेचीही भारतात निर्मिती होऊन तिचे जलावरण करण्यात आले. त्याचप्रमाणे पंतप्रधान मोदींनी व्होकल फॉर लोकलचा नारा देत स्थानिक वस्तू, उत्पादने खरेदी करण्याची साद घातली. त्यास नागरिकही प्रतिसाद देत आहेत. एकूणच आपला देश आता प्रत्येक क्षेत्रात स्वयंपूर्ण होत आहे. अशातच ५जी सेवेमुळे विकासाचा वेग वाढणार आहे. सुरुवातीला ही सेवा देशातील प्रमुख १३ शहरांमध्ये दिवाळीपर्यंत उपलब्ध करून दिली जाणार आहे. यामध्ये आपल्या राज्यातील मुंबई, पुणे या दोन शहरांचा समावेश आहे. सध्या रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल या दोन कंपन्या ही सेवा देणार आहेत. काम करताना विनाअडथळा व वेगवान सेवेमुळे वेळ आणि पैशाचीही आपसूक बचत होणार आहे. ५जी या स्वदेशी डिजिटल सेवेमुळे तंत्रज्ञान देशात क्रांती घडणार आहे आणि या क्रांतीचे आपण सर्व देशवासी साक्षीदार असणार आहोत.**

# कर्जत पालिकेची स्वच्छतेमध्ये गगनभरारी

### खबरबात
संतोष पेरणे





केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियानात कर्जत पालिकेने मागील काही वर्षे सुरू केलेले स्वच्छतेचा पुरस्कार करणारे काम यास साचेबद्ध पध्यतीने मांडण्यास सुरुवात केली होती. त्यात राज्य सरकारच्या वसुंधरा अभियानाची जोड मिळाली आणि नंतर स्वच्छ सर्वेक्षण अभियान आणखी यशस्वी पणे राबविली. त्या सर्व योजना पालिकेचे सर्व पदाधिकारी आणि आरोग्य तसेच अन्य सर्व विभागाचे कर्मचारी या सर्वांना एकत्र घेऊन हे अभियान राबविले. शहरातील सर्व भागात अभियान राबविण्यात यशस्वी ठरल्याने कर्जत पालिकेला स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२१ मध्ये देशात १५वा क्रमांक मिळाला आहे. या अभियानात मिळालेले थ्री स्टार शहरांचे मानांकन पालिकेला भरीव निधी देण्यास फायद्याचे ठरले होते आणि त्यातून सर्वांना स्वच्छतेच्या बाबतीत काम करण्याची प्रेरणा मिळाली होती.



कर्जत हे मुंबईचे उपनगर असलेले शहर कायम स्वच्छ असावे यासाठी कटिबद्ध आहोत आणि आगामी वर्षात स्वच्छ सर्वेक्षणमध्ये देशातील पहिल्या पाच क्रमांकात यायचे आहे. त्यासाठी स्वच्छतेबरोबर अन्य पूरक कामांना सुरुवात केली आहे. त्यामुळे २०२२च्या अभियानात कर्जतचा डंका नक्की असेल आणि त्यांचे प्रयत्य २०२२चे क्रमांक जाहीर करताना आला आणि कर्जत नगर परिषद पश्चिम झोनमध्ये पहिली तसेच २५ ते ५० लोकसंख्या असलेल्या शहरांच्या स्पर्धेत देशात पहिल्या क्रमांकावर राहिली आहे. त्यासाठी पालिकेच्या माध्यमातून कर्जत हे गार्बेज फ्री सिटी म्हणून पुढे येत असताना जुनी घरे किंवा जुन्या इमारती या पडल्यानंतर त्यातुन निघणाऱ्या विटा, माती, दगड, सिमेंट,वाळू असे बांधकाम साहित्य गार्बेज स्वरूपातील वस्तूंचे काय करावे हा राज्यासमोर देशासमोर प्रश्न निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र राज्यातील नगर परिषदात सर्वांत आधी सर्व गार्बेज गोळा केला जातो आणि त्यात प्लास्टिक तसेच रबर यांचे मिश्रण करून पेव्हर ब्लॉक तसेच गतिरोधक बनवतो. पुणे येथील या विषयवार पेटंट घेणारी कंपनी आणि हा प्रकल्प कर्जत नगर परिषद राबवत आहे. या प्रकल्पातून बनलेले गतिरोधक राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर लावले आहेत. त्या साहित्यापासून बनवलेल्या पेव्हर ब्लॉकचा रास्ता आमच्या डम्पिंग ग्राउंडवर बनविण्याचे नियोजन केले आणि सध्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर प्रायोगिक तत्वावर बनवलेले गतिरोधक हे तब्बल दोन महिन्यांपर्यंत टिकावू असल्याचे सिद्ध झाले आहे. राज्यातील आणखी ८६ रस्त्यांवर हे गतिरोधक बसवून घेण्यावर राष्ट्रीय महामार्ग ऑथॅरिटी कडून विचार सुरू आहे. त्यामुळे असे गतिरोधक आणि पेव्हर ब्लॉक बनविण्यासाठी शासनाकडे निधी आणि प्रकल्प उभारणीची मागणी केली आहे.

कर्जत शहर सहा स्केअर किलोमीटर मध्ये असून शहरात ३० किलोमीटरच्या एकूण रस्त्यानापैकी २० किलोमीटर लांबीचे रस्ते आरसीसी कॉंक्रीटचे बनले आहेत. आता शहराचे भाविषयातील नियोजन लक्षात घेऊन मोठे म्हणजे ९ ते १२ मीटर रुंदीचे रस्ते बनविण्याचे धोरण आहे. त्यासाठी १७ रस्त्यांना एमएमआरडीएच्या माध्यमातून परवानगी मिळाली आहे.

कर्जत शहर कचऱ्यावर प्रक्रिया करणारे शून्य कचरा डेपो असलेले शहर असल्याने शहर पाहण्यासाठी राज्याच्या देशाच्या वेगवेगळ्या भागातून अभ्यासक येत असतात. त्यांना शहरात प्रवेश केल्यावर कचरा टाकण्याची जी ठिकाणे समजली हजारात त्यात शहरातील वेगवेगळे कोपरे प्रमुख असतात. ते लक्षात घेऊन आम्ही कोपरा गार्डन हि संकल्पना राबवत असून शहरातील विविध २६ ठिकाणी कोपरा गार्डन विकसोट केली जात असून त्यातून शहर आणखी सुंदर दिसेल आणि त्यानिमित्तने शहराची मानसिकता काय आहे? याचीदेखील कल्पना शहरात पाहुणे म्हणून येणारे अभ्यासक यांच्या नजरेत भरू शकेल. शहरातील कचरा प्रामुख्याने चार भागात वर्गीकरण केला जात असून तो ओला, सुका कचरा हा आम्हला बायोगॅस प्रकल्पाला लागत असतो. शहरातून दररोज ३ टन ओला कचरा गोळा होतो आणि त्या कचऱ्यावर बारोगास प्रकल्प येथे प्रक्रिया करून गॅस निर्मिती केली जाते. त्या गॅस वर शहरातील १०० पथदिवे प्रकाशमान होतात आणि त्यातून दररोजचे तीन युनिट असे महिन्याला ३०० युनिटचे बिल पालिका वाचवतो. तर याच कचऱ्यापासून आम्ही खताची निर्मिती करतो, त्यातून पालिकेला महिन्याला किमान ५० हजाराचे महसूल प्राप्त होतो.

उल्हास नदी संवर्धन प्रकल्प राज्य सरकारच्या परिवाराण विभागाने तत्त्वता मान्यता दिली आहे. ५० कोटी रुपयांचा खर्च असलेला हा प्रकल्प राबविताना उल्हासनदीचे पाणी ज्या चार ठिकाणी नदी पात्राच्या बाहेर निघून शहरात घुसते तेथे तटबंदी उभारली जाऊ शकते. त्याचवेळी त्या सर्व प्रकल्पात लहान लहान बगीचे फुलविणार असून नदीच्या कडेला पाथ-वे, सायंकाळी येणारी नागरिकासाठी खाऊ गल्ली, बसण्यासाठी एकसारखे बाकडे, विजेचे रोषणाई अशी योजना असून उल्हास नदीचे प्रदूषण थांबावे असा प्रयत्न या नदी संवर्धन प्रकल्पात आहे. शहरातील सांडपाणी एका ठिकाणी गोळा करण्यासाठी आणि त्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा पुनर्वापर व्हावा यासाठी भुयारी गटार प्रकल्प प्रस्तावित आहे. ७५ कोटी रुपये खर्चाचा या प्रकल्पच आरखडा बविण्याचे काम सुरू असून हा प्रकल्पदेखील कर्जत शहराला एका उंचीवर नेऊन ठेवणारा ठरू शकतो.



**स्वच्छ सर्वेक्षणात कर्जतचे गुणांकन**

- कर्जत शहराला ६०००पैकी ५७८५ गुण मिळाले
- पश्चिम झोन (पाच राज्यांचे) क्रमांक ३१०मध्ये प्रथम
- राज्यस्तरीय ११५मध्ये प्रथम
- स्वच्छ शहर म्हणून २०२२चा क्रमांक



## बदलते तंत्रज्ञान

# गुगलच्या नवीन फीचर्समुळे सर्चिंग व शॉपिंगची मजा दुप्पट


युजर्सना अधिकाधिक चांगली सेवा मिळावी हाच नेहमी गुगलचा प्रयत्न असतो. युजर्सना कोणत्या फीचर्सचा अधिक फायदा होईल आणि त्यांचे काम अधिक सोपे होईल याकडेदेखील कंपनी विशेष लक्ष देते. अशात टेक जायंट सर्च इंजिन गुगलने नऊ भन्नाट फीचर्सची घोषणा केली आहे. हे नवीन फीचर लॉंच केल्यानंतर गुगल युजर्सना उत्तम युजर अनुभव मिळेल. म्हणजे तुम्हाला गुगल कडून खरेदीचा उत्तम अनुभव मिळेल. युजर्सना खरेदीचे ठिकाण ते नवीन ट्रेडिंग शॉपिंगसह अनेक प्रकारची माहिती मिळेल. मात्र, हे फिचर्स प्रथम अमेरिकेत उपलब्ध करून दिले जातील.



शॉपिंग फिल्टर्स : खरेदीसाठी नवीन फिल्टर्स असतील, जे रियल-टाइम शोध ट्रेंड देईल. सर्च बॉक्स : गुगल ॲपमध्ये डिस्कव्हर वापरून युजर स्टाईल आधारित खरेदी करता येईल. शॉपिंग लिंक : एखाद्या प्रोडक्टविषयी सविस्तर जाणून घ्यायचे असेल तर हे फीचर खूप कामी येईल. कारण, गुगल ॲपच्या या फीचरच्या मदतीने युजर्सना प्रोडक्टची सविस्तर माहिती मिळेल, प्रोडक्टमध्ये काय दोष आहे आणि चांगले आहे. पर्सनल रिझल्ट्स: यामध्ये युजर्स त्यांची स्वतःची खरेदी सूची तयार करू शकतील ज्यामुळे ते पर्सनल रिझल्ट्स सहजपणे नियंत्रित करू शकतील. थ्रीडी शॉपिंग : गुगलकडून मशीन लर्निंगसाठी थ्रीडी व्हिज्युअल सपोर्ट प्रदान केला जाईल. त्याच्या मदतीने, उत्पादन ३६० अंशांपर्यंत फिरण्यास सक्षम असेल. शॉपिंग इनसाईड्सच्या मदतीने, युजर्सना उपयुक्त खपीळसहीं मिळेल, जे खरेदी करण्यात मदत करेल. यामध्ये यूजर्सना अनेक प्रकारच्या कॅटेगरी मिळतील. शॉप द लूक : हे फीचर यूजर्सना परफेक्ट आउटफिट देईल. म्हणजे जर तुम्ही बंबर जॅकेट शोधले तर हे टूल बंबर जॅकेट असलेली इमेज दाखवेल. कॉम्प्लीमेंट्री पीस कोठे खरेदी करू शकतो? तुम्ही ही माहिती मिळवू शकाल. हे फीचर देखील युजर्सच्या खूप कामी येईल. ट्रेंडिंग शॉपिंग : कंपनीचे ट्रेंडिंग शॉपिंग हे शोध फीचर लोकप्रिय उत्पादनांची यादी दर्शवेल. जे युजर्सना नवीन मॉडेल, शैली आणि ब्रँडची माहिती देईल. गुगल वर्ड शॉप : गुगलच्या वर्ड शॉप वैशिष्ट्याच्या मदतीने, प्रोडक्ट फीडमध्ये खरेदी आयटमचे व्हिज्युअल दिसेल. तसेच, तुम्ही जवळच्या इन्व्हेंटरीबद्दल माहिती मिळवण्यास सक्षम असाल. यासोबतच गुगलने आपल्या गुगल लेन्समध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्याच्या मदतीने इमेज आणि टेक्स्टच्या मदतीने सर्चही करता येईल.

# सन्यासी योद्धा स्वामी रामानंद तीर्थ

### निमित्त



हैदराबाद मुक्ती संग्रामाचे अध्वर्यू स्वामी रामानंद तीर्थ यांचा आज जन्मदिन. आपले राजकीय आणि शैक्षणिक कार्य जरी स्वामींनी मराठवाड्यात केले असले, तरी त्यांचा जन्म मात्र कर्नाटकात ३ ऑक्टोबर १९०३ रोजी झाला होता. उत्कृष्ट संघटक, प्रभावी वक्ते असणा-या स्वामी रामानंद तीर्थ यांनी तेलुगू, कानडी आणि मराठी भाषकांनी बनलेले हैदराबाद राज्य आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्रात विभागून समाविष्ट करण्याकामी विशेष परिश्रम घेतले. आपल्या अनुयायांमध्ये नि:स्वार्थ सेवा, त्यागी वृत्ती, आत्मविश्वास आणि निष्ठा निर्माण करणारा हा संन्यासी! त्यांच्या व्यक्तिमत्त्वात राजनीती आणि अध्यात्माचा संयोग झाला होता. कामाला गती देण्याची क्षमता आणि दलितांविषयी अपार कणव असणा-या रामानंद तीर्थ यांनी आपल्या शांत, निश्चयी आणि सामर्थ्यशाली अशा शक्तिमान नेतृत्वाने हैदराबाद मुक्ती संग्रामाला दिशा दिली. १९५२ व ५७मध्ये अनुक्रमे गुलबर्गा व औरंगाबाद मतदारसंघातून लोकसभेवर गेलेल्या स्वामीजींनी पुढे राजकारणाचा त्याग करून सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्राला स्वत:ला वाहून घेतले. हैदराबादच्या मुक्ती संग्रामाचे नायक असणा-या स्वामी रामानंदांनी रामतीर्थ आश्रमासाठीच उर्वरित आयुष्य वेचले. हैदराबाद येथे हिंदी प्रचारसभेचे ते अध्यक्ष होते.

स्वामी रामानंद तीर्थ (ऊर्फ व्यंकटेश भगवानराव खेडगीकर) (३ ऑक्टोबर १९०३ ते २२ जानेवारी १९७२) हे एक संन्यासी व हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेतृत्व करणारे चळवळकर्ते होते. त्यांचा जन्म विजापूर जिल्ह्यातील सिंदगी या ठिकाणी झाला. त्यांचे शिक्षण सोलापूर येथील सरकारी शाळेत झाले. उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा रवा या गावी गुरुकुलात ते कार्यरत होते. इ.स. १९३० मध्ये स्वामी नारायण तीर्थ यांनी त्यांना दीक्षा दिली व ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. अंबेजोगाई या ठिकाणी त्यांनी योगेश्वरी नूतन विद्यालयाचे नूतनीकरण केले.

हैदराबाद येथील निजामाचा सेनापती कासीम रझवी याच्या 'रझाकार' या संघटनेने मराठवाड्यातील। जनतेवर अत्याचार सुरू केले होते. याचा विरोध करणे आवश्यक झाले होते. यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्र परिषदेचे चिटणीस म्हणून स्वामी काम पाहत होते. यासाठीची चळवळ अनेक वर्षे चालली होती. २७ ऑक्टोबर, १९३८ रोजी स्वामी रामानंद सत्याग्रहासाठी कार्यकर्त्यांसह हैदराबाद शहरातील राजमार्गावर आले. त्यांना अटक झाली होती. ते सुमारे चार महिने कारावासात होते. सुटका होताच स्वामीजींनी भूमिगतपणे काम केले.

'हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करून लोकशाही मान्य करा व संस्थानाचे स्वतंत्र अस्तित्व संपवा' अशी हाक रामानंद तीर्थ यांनी सरकार आणि जनतेला दिली. याचा परिणाम होऊन लोक या संग्रामात सामील झाले. मुक्तिसंग्रामात आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी 'व्हिजन' हे साप्ताहिक चालवले होते. यामार्फत ते भारतीय स्वातंत्र्याच्या विचारांचा प्रचार करत. माणिकराव पहाडे, शंकरभाई पटेल, बाबासाहेब परांजपे. गोविंदभाई श्रॉफ हे तरुण स्वातंत्र्यसैनिक होते. हैदराबाद मुक्तिसंग्राम चळवळीत स्वामी रामानंद तीर्थ यांचे ते प्रमुख समर्थक होते. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी सशस्त्र पोलीस कारवाई करून निजामाला शरण आणले. हैदराबाद संस्थान १७ सप्टेंबर १९४८ रोजी भारतात विलीन झाले.

लोकसभेच्या लागोपाठच्या दोन निवडणुकांत गुलबर्गा व औरंगाबाद येथून रामानंद तीर्थ हे निवडून गेले होते. १९७२ साली त्यांचे हैदराबाद येथे निधन झाले.

**(साभार : विकीपिडीया आणि प्रहार)**

### क्लिक...क्लिक...!



**पनवेल : गणेशमूर्ती पूजनानंतर घरच्या घरी विसर्जन करून उरलेली माती मूर्तिकारांना परत देऊन शून्य प्रदूषणाचा अभूतपूर्व उपक्रम खारघर, कामोठे, सुकापूर, पनवेल, नवीन पनवेल व करंजाडे येथील पनवेल वेस्ट वॉरियर्सनी राबविला. या उपक्रमात घनश्याम पाटील, गौरी काशीकर, प्रल्हाद बोडके, तनय दीक्षित, विनोद शिंगण व वृषाली म्हात्रे यांनी जनजागृती केली. हा कार्यक्रम गणेश शिंदे, प्रतिक्षा महाडिक, राजीव अधिकारी व तुषार लेले यांनी यशस्वी केला.**

## आरोग्य प्रहर

# तारुण्य टिकवायचे असेल, तर एक मूठभर बदाम खा!

तुम्हाला माहित आहे का की, बदामामध्ये १५ प्रकारचे पोषक असतात आणि हे अँटीऑक्सिडेंट व्हिटॅमिन-ई चे पॉवरहाऊस आहे. हे मुक्त रॅडिकल्स आणि यूव्ही किरणांपासून त्वचेचे संरक्षण करतात. दररोज बदाम खाणे त्वचेच्या आरोग्यासाठी खूप चांगले मानले जाते आणि यामुळे त्वचेची चमक वाढते. मूठभर बदाम खाल्ल्याने सुरकुत्या कमी होण्यास मदत होते. १५ बदाम खाल्ल्याने तुम्हाला तुमच्या रोजच्या व्हिटॅमिन-ई च्या ५० टक्के गरजांची पूर्तता होते.



बदामाला सुपरफूडदेखील म्हणतात. त्यात नियासिन, कॅल्शियम, व्हिटॅमिन ई, फायबर आणि रिबोफ्लेविनचे प्रमाण जास्त असते. यात ओमेगा-६ भरपूर प्रमाणात आढळतं. तर फॅटी ॲसिड, पोटॅशियम, मॅग्नेशियम, आणि जस्त यांचा ही समावेश आहे.

बदामामध्ये मोनोअनसॅच्युरेटेड फॅट, फायबर, प्लांट बेस प्रोटीन आणि व्हिटॅमिन ई यांसारखे महत्त्वपूर्ण पोषक घटक असतात. त्यामुळे बदाम त्वचेसोबतच हृदयासाठीही फायदेशीर आहे.

बॉलिवूडमध्ये अनेक फिटनेस फ्रिक अभिनेत्री ज्या वयाच्या ४५ व्या वर्षीही फिट आणि सुंदर दिसतात. याचे सर्व श्रेय त्याच्या फिटनेस रुटीनला जाते. स्वत: ला फिट ठेवण्यासोबतच या अभिनेत्री डायट टिप्सही शेअर करतात. बहुतेक अभिनेत्री बदामाला सुपरफूड मानतात आणि त्याचे फायदेही सांगतात.

बदाम भिजवल्यानंतर का खातात, सुके बदाम का खात नाहीत? जर तुम्हाला उत्तर माहित नसेल तर जाणून घ्या की बदाम सालासह खाणे तितके फायदेशीर नाही जेवढे बदाम साल काढून खाणे आहे. याचे मुख्य कारण बदामाच्या त्वचेमध्ये टॅनिन नावाचे घटक असते, जे या पोषक तत्वांचे शोषण रोखते.

वाळलेल्या बदामाची साले काढणे शक्य होत नाही, तर बदाम पाण्यात भिजवल्याने साल सहज निघतं. अशात तुम्हाला बदामाचे पूर्ण पोषण मिळते, जे सालासकट मिळू शकत नाही. यामुळेच कच्च्या ऐवजी भिजवलेले बदाम खावेत. हे अधिक फायदेशीर ठरतील.

भिजवलेले बदाम खाल्ल्याने पचनक्रियाही संतुलित राहते. यामध्ये भरपूर प्रमाणात अँटी-ऑक्सिडेंट असतात, जे वृद्धत्व नियंत्रित करतात. बदामामुळे रक्तातील अल्फाल टोकोफेरॉलचे प्रमाण वाढते, जे रक्तदाब नियंत्रित करते. भिजवलेले बदाम चांगले कोलेस्ट्रॉल वाढवतात आणि खराब कोलेस्ट्रॉल कमी करतात. हे फॉलिक ॲसिडमध्ये समृद्ध आहे, जे गर्भधारणेदरम्यान बाळाच्या मेंदू आणि न्यूरोलॉजिकल सिस्टमच्या विकासास मदत करते.

# कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे काम रखडले

## शेतकऱ्यांचे हरितक्रांतीचे स्वप्न अपूर्ण; पुनरुज्जीवन करण्याची मागणी



**माणगाव : प्रतिनिधी**

कुंभे जलविद्युत प्रकल्पाचा एकत्रित खर्च प्रशासकीय मान्यताप्राप्त खर्चापेक्षा जास्त झाल्यामुळे प्रकल्पास चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्याशिवाय व तत्कालीन शासनाने नवीन बांधकाम सुरू करण्याचे आदेश वेळीच न दिल्याने प्रकल्पाचे काम रखडले आहे. १६ वर्षानंतरही कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे काम रखडल्याने या भागातील शेतकऱ्यांचे हरितक्रांतीचे स्वप्न अपूर्णच राहिले आहे.

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील कुंभे जलविद्युत या बहुउद्देशीय प्रकल्पाची योजना माजी मुख्यमंत्री कै. बॅ. ए. आर. अंतुले यांची होती. या प्रकल्पामुळे वर्षभर नागरिकांच्या वीज व पाणी या मूलभूत गरजांचे निराकरण हमखास होईल व कृषि व उद्योगाला विशेष चालना मिळून मागासलेल्या कोकणचा विकास होईल, अशी यामागची संकल्पना होती, परंतु त्यांच्या अल्प कारकिर्दीमुळे ही योजना मागे पडली. कुंभे जलविद्युत प्रकल्पाला १५ ऑक्टोबर १९९८मध्ये सुमारे १०० कोटी रुपयांची मान्यता मिळाली व तेथे जाण्या-येण्याच्या रस्त्यासाठी, बोगद्यासाठी ११ एप्रिल २००२ साली वनविभागाची मान्यता मिळाली.

भविष्यातील विजेची वाढती मागणी व तुटवडा लक्षात घेऊन वीजनिर्मिती बरोबर सिंचन क्षेत्रासाठी व औद्योगिक वसाहतीत पाणी उपलब्ध होईल, असा महत्त्वाकांक्षी प्रकल्प तयार केला. १७ नोव्हेंबर २००६पासून कुंभे धरणाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. बोगदा खणून प्रकल्पापर्यंत जाण्याचा रस्ता तयार करण्यात आला.

उन्हाळ्यामध्ये कोकणात अनेक गावांना पाण्याची टंचाई, वीज खंडित होणे असे प्रकार कमी होण्यास या प्रकल्पामुळे मदत होणार आहे.

### काही कामे पूर्णत्वाच्या प्रतीक्षेत...

**तृतीय सुधारित प्रशासकीय कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी २५२ कोटी ३७ लाख ५१ हजार रुपये खर्चाची प्रशासकीय मंजुरी ६ जानेवारी २०११ रोजी मिळून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली होती. १५ नोव्हेंबर २०१७पर्यंत २०० कोटी १२ लाख ३७ हजार रुपये खर्च होऊन धरणाचे काम ७० टक्के, सारिका विमोचन ७५ टक्के, सांडवा ९० टक्के, जलवहन प्रणाली खोदकाम ९१ टक्के, विद्युतगृह १० टक्के इतके काम झाले आहे. कुंभे येथे धरणालगत ११८ कुटूंबाना प्लॉट दिले, तर उर्वरित कुटूंबाचे भादाव येथे पुनर्वसन अर्धवट स्थितीत करण्यात आले.**

# नेरळमध्ये नवरात्रोत्सवात रंगला विद्यार्थ्यांचा भोंडला



**कर्जत : बातमीदार**

नेरळ येथील मोहाची वाडी येथील नवरात्रोत्सव मंडळ समितीच्या वतीने महिलांसाठी नृत्याच्या स्पर्धा आणि विद्यार्थ्यांसाठी भोंडला आयोजित करण्यात आला होता.

नवरात्रीनिमित्त रणरागिणी महिला मंडळाच्या वतीने लहान मुले आणि महिलांसाठी भोंडला कार्यक्रमाचे आयोजन मंडळाच्या अध्यक्षा वर्षा किरण बोराडे यांनी केले होते. कार्यक्रमात गरबा आणि लहान मुलांचे डान्स यांचे आयोजन केले होते. महिलांनी आणि लहान मुलांनी डान्स, महिलांनी फुगड्या, देवीचे भजन व गाणे कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमाला मंडळाच्या उपाध्यक्षा सुरेखा डागरे, वंदना गायकर, सचिव निलम गुप्ता, मंडळाच्या सदस्य रंजना गायकवाड, सुमित्रा गायकवाड, रेश्मा खान, नाजिरा अनसारी, सुनिता भगत, मंगला राजभर, वंदना मिश्रा, सुनीता मोरे, रजिता ठाकुर, अनिता वाघमारे, लक्ष्मी बावस्कर, सरिता पाठक, सुमन शिंगाडे, लालती गुप्ता, शिवकन्या शेप, संगीता पाल इतर महिलांनी कार्यक्रमाला नियोजनात आणि सहभाग घेऊन कार्यक्रम उत्साहात साजरा केला.

# आयडब्ल्यूबीपी प्रकल्प, माझी वसुंधरा अभियान कार्यशाळा



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था कर्मचाऱ्यांसाठी इंटिग्रेटेड वेब बेस्ड पोर्टल (आयडब्ल्यूबीपी प्रकल्प)बाबतचे प्रशिक्षण व माझी वसुंधरा अभियान ३.०च्या अनुषंगाने कार्यशाळा दि.२९ सप्टेंबर रोजी जिल्हा नियोजन सभागृहात झाली.

हे प्रशिक्षण व कार्यशाळा जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील व जिल्हा प्रशासन अधिकारी श्री. शाम पोशट्टी, यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आली होती.

प्रकल्पाचे प्रशिक्षण कोकण विभागाच्या विभागीय नोडल ऑफिसर कृत्तहा पाटील व रायगड जिल्हा नोडल अधिकारी प्रविण भोई यांच्यामार्फत देण्यात आले. या प्रकल्पांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे दिल्या जाणाऱ्या नागरी सेवा ऑनलाईन पध्दतीने दिल्या जाणार आहेत. या प्रकल्पामुळे प्रशासकीय कामकाजात सहाय्यासाठी एकूण २७ मोड्युल पुरविले जाणार आहेत. हा प्रकल्प इस ऑफ डुईंग बिझनेस (इओडीबी) तसेच सेवा हमी कायद्यांतर्गत (आरटीएस) येणाऱ्या सेवा पुरविण्याकरिता अत्यंत आवश्यक आहे. या प्रशिक्षणामध्ये आयडब्ल्यूबीपी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामधील २७ मोड्युलपैकी इओडीबी व आरटीएससी संबंधित एकूण सहा मोड्युलचे प्रशिक्षण देण्यात आले, तसेच माझी वसुंधराबाबतच्या कार्यशाळेमध्ये विभागीय तांत्रिक तज्ञ संजीवनी जाधव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश ही पंचतत्वे आणि पर्यावरण संवर्धन या विषयांची विस्तृत माहिती देण्यात आली.

शेवटी सर्वांनी अभियान ३.० जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्याचा संकल्प केला.

# उल्हास नदीवर कर्जतच्या श्रीराम पुलालगत नवीन पूल उभारणार

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

उल्हास नदीवर बांधलेल्या श्रीराम पुलावरून चौक-कर्जतमार्गे मुरबाड एमआयडीसीकडे अवजड वाहतूक सुरू असते. सुमारे ७० वर्षांपूर्वी उभारलेल्या श्रीराम पुलाची सध्या दूरवस्था झाली आहे. याचीच दखल घेत अवजड वाहनांचा ताण कमी करण्यासाठी याच पुलालगत नवीन पूल उभारण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अक्षय चौधरी यांनी दिली आहे.

नवीन पूल उभारणार असल्याने पुलाच्या दोन्ही बाजूस पुलाच्या बांधकामाला अडथळा ठरणारे अतिक्रमण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जेसीबीच्या साह्याने हटविण्यात आले आहे. पुलाचे काम पुढील दीड ते दोन वर्षांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्याची लांबी १०४ मीटर असून रुंदी १२ मीटर आहे. बांधकामासाठी सुमारे सात कोटी खर्च अपेक्षित आहे. ७० वर्षांत मुरबाड एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. कर्जतच्या नागरिकरणातही वाढ झाल्याने पूल वाहतुकीस अपुरा पडू लागला आहे. पादचारीही याच पुलाचा वापर करतात. दोन वाहने एकमेकांसमोर आल्यास पादचाऱ्यांची गैरसोय होते. अवजड वाहनांचीही क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होत असल्याने पुलाची दूरवस्था झाली आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कुसगाव, ता. महाड, जिल्हा रायगड, येथील खालील वर्णनाच्या मिळकती या आमचे अशिल श्री. संजिव कुमार यांनी सदर मिळकतींचे मुळ मालकांकडून कायम स्वरुपात खुषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा वहिवाट, इजमेंट बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

**मिळकतींचे वर्णन**

| सर्वे / गट भूमापन नं. | एकूण क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ८५४ | ४-३१-००<br>पो.ख. १-६८-००<br>एकूण क्षेत्र ५-९९-०० | २.५० | श्रीमती सुलभा सुरेश तांबट उर्फ हेमलता काशिनाथ करडे |
| ८५३ | ५-५५-००<br>पो.ख. १-८७-००<br>एकूण क्षेत्र ७-४२-०० | ३.५० | श्रीमती लिलावती विष्णु देशमुख व इतर ९ |
| ६८३ | ७-५३-००<br>पो.ख. १-७४-००<br>एकूण क्षेत्र ९-२७-०० | ४.०० | श्री. विठ्ठल सखाराम महाडीक व इतर २१ |

ठिकाण : मुंबई
ता. : ३०-०९-२०२२

**श्री. संजिव कुमार**
**मो. ९१११०९५१११**
**श्रीमती डिंपल कटारीया**
**मो. ९८९२००३८९३**

**सही/-**
**ॲड. प्रतिक्ष टेपन**
**वकील, उच्च न्यायालय**
**पत्ता : बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०००५१**
**मो. नं. ९८१९८६०९५५**


# द रियल हिरो अवॉर्डने राकेश काठे सन्मानित



**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलचे सर्वपरिचित सर्पमित्र राकेश काठे यांना नुकतेच द रियल हिरो अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे.

वन्य जीव क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल हिंगोली येथील सर्पमित्र विजयराज पाटील व मित्रमंडळ यांच्या संकल्पनेतून सर्पतज्ज्ञ डॉ. संजय नाकाडे व सर्पतज्ज्ञ निलीमकुमार खैरे यांच्या वाढदिवसाचे औचित्याने आयोजित कार्यक्रमात त्यांना सन्मानित करण्यात आले. गेली अनेक वर्षे चौल पंचक्रोशीत निसर्ग मित्र या व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून कार्यरत असलेले सर्पमित्र राकेश काठे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

शालेय जीवनापासून निसर्ग प्रेमी असलेले राकेश काठे हे सर्पमित्र म्हणून क्रियाशील आहेत. २२ वर्षांच्या कालावधीत त्यांनी असंख्य सर्पांना त्यांनी जीवनदान दिले आहे.


## ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे
ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीर सूचना २०२२/२३/क्र.४**

दिनांक ३/१०/२०२२

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड हे गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील विकासकामाच्या अंमलबजावणीकरिता सिलबंद निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम ठराव नं. मासिक सभा दिनांक | इसारा १% रक्कम (ना परतावा) | निविदा फॉर्म फी | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गुळसुंदे येथे श्री. केशव पाटील ते विलास सावंत पर्यंत R.C.C रस्ता तयार करणे. | रु.१०४४७५/- ठराव नं.५५/१ दि.२३/०९/२०२२ | १०४४/- | ५००/- | ११/१०/२०२२ | २ महिने |
| २ | गुळसुंदे येथे सुरेश पाटील ते अविनाश भोईर पर्यंत R.C.C रस्ता तयार करणे. | रु. २१४९९१/- ठराव नं.५५/२ दि.२३/०९/२०२२ | २१४९/- | ५००/- | ११/१०/२०२२ | २ महिने |
| ३ | लाडीवली आदिवासीवाडी येथे पाणीपुरवठा पाईपलाईन करणे. | रु. २३७९०६/- ठराव नं.५५/८ दि.२३/०९/२०२२ | २३७९/- | ५००/- | ११/१०/२०२२ | २ महिने |
| ४ | आकुळवाडी येथे रमेश म्हात्रे घराजवळ स्लॅब मोरी बांधणे. | रु. ७६९१७/- ठराव नं.५६/१८ दि.२३/०९/२०२२ | ७६९/- | ३००/- | ११/१०/२०२२ | १ महिने |
| ५ | आकुळवाडी येथील स्मशानभूमीची दुरुस्ती करणे. | रु. १६६१४९/- ठराव नं.५६/१९ दि.२३/०९/२०२२ | १६६१/- | ५००/- | ११/१०/२०२२ | २ महिने |
| ६ | १५ वा वित्त मधूल लाडीवली येथे गटार बांधणे. | रु. ९७७३५/- ठराव नं.५६/२० दि.२३/०९/२०२२ | ९७७/- | ५००/- | ११/१०/२०२२ | २ महिने |
| ७ | १५%तून लाडीवली आदिवासीवाडी येथे स्मशानभूमी व शेड बांधणे. | रु. ३४१६४३/- ठराव नं.५६/२१ दि.२३/०९/२०२२ | ३४१६/- | १०००/- | ११/१०/२०२२ | २ महिने |
| ८ | गुळसुंदे येथे नवीन पंप बसविणे. | रु. ८५२७१/- ठराव नं.५५/९ दि.२३/०९/२०२२ | ८५२/- | ३००/- | ११/१०/२०२२ | १ महिने |
| ९ | १५%तून लाडीवली आदिवासीवाडी अंतर्गत रस्ता तयार करणे. | रु. ४९९५००/- ठराव नं.५६/२२ दि.२३/०९/२०२२ | ४९९५/- | १०००/- | ११/१०/२०२२ | ३ महिने |

**१. निविदा मिळणेकरिता दि. ०३/१०/२०२२ ते ०६/१०/२०२२ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.**
२. अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दिनाक ०७/१०/२०२२ ते १०/१०/२०२२ (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
३. भरलेल्या सिलबंद निविदा दि. ११/१०/२०२२ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारण्यात येतील. दि.११/१०/२०२२ रोजी दुपारी १ वाजता समक्ष उघडणेत येतील.
४. इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत गुळसुंदे यांचे नावे असावा अथवा चेकने / रोखीने.
५. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
६. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.
७. निविदा पोस्टाने पाठवली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारली जाणार नाही.
८. निविदा फॉर्म किंमत नापरतावा राहील.
९. नियमाप्रमाणे आयकर व GST भरावा लागेल.
१०. अधिकृत/ नोंदणीकृत ठेकेदाराचीच निविदा स्वीकारण्यात येईल / ग्राह्य धरली जाईल.
११. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% आयकर, १% लेबर इन्शुरन्स, १% उपकर बिलातून कपात केली जाईल.
१२. २% GST ग्रा. प. कट करील तर १०% GST संबधीत नोंदणीकृत ठेकेदारांनी शासनास भरणा करणे बंधनकारक आहे.
१३. ज्या ठेकेदाराकडे GST नंबर नसेल त्यांच्याकडून २% ऐवजी ५% कपात करून घेण्यात येईल.
१४. वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न केल्यास दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीचे काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस संबंधितास जबाबदार राहावे लागेल.
१५. झालेल्या तांत्रिक मूल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्धेनुसार देयके अदा केली जातील. (अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त नाही तसेच कमी दराची रक्कम देय असेल.)
१६. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसात काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१७. मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी JE यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१८. निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१९. सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिनेपर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील. केलेल्या कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
२०. काम पूर्ण करणेपूर्वीचा कामाचे ठिकाणाचे फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाही.
२१. सोबत दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे.
२२. निविदाधारकाकडे पॅन असणे गरजेचे आहे.
२३. ज्याची निविदा मंजूर होईल ती व्यक्ती निविदा उघडण्याच्या वेळी हजर नसल्यास सदर निविदा नामंजूर करणेत येईल. याची नोंद घेणे.
२४. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्विकृत राहील.
२५. बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे नावाचा बोर्ड बसविणे आवश्यक आहे.
२६. मंजूर काम अंदाजपत्रकाप्रमाणे करणेत यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.
२७. ठेकेदाराने केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षणात त्रुटी आढळून आल्यास संबधित ठेकेदाराला जबाबदार धरण्यात येईल.
२८. कमीत कमी दराची निविदा मंजूर करणेबाबत विचार करण्यात येईल / नोंदणीकृत ठेकेदाराला प्राधान्य राहील.
२९. एक किंवा सर्व निविदा नामंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
३०. आकस्मित एखादे काम रद्द करणेचा सार्वजनिक निर्णय झाल्यास भरलेली निविदा फी परत मिळणार नाही.

**सही/-**
**रामदास दासगांवकर**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

**सही/-**
**हरिश्चंद्र बांडे**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**


# सुधागडवासीयांची देवता राबगावची वरदायिनी माता

**पाली : प्रतिधिही**

सुधागड तालुक्यातील राबगाव येथील मातेचे स्वयंभू स्थान म्हणजे वरदायिनी माता. ही माता राबगावची तसेच अनेक भक्तांची रक्षणकर्ती आहे, असे सांगितले जाते. राबगावच्या दक्षिणेकडील उंच टेकडीवर आई वरदायिनीचे मंदिर आहे. मंदिराच्या दक्षिण बाजूस अंबानदीचा प्रवाह वाहत असून पूर्व बाजूस दिसणारे बल्लाळेश्वराचे मंदिर आहे.

आई वरदायिनीची अख्यायिका अशी आहे की, पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र सीता शुद्धीसाठी दक्षिणेकडे चालले होते. पार्वतीने सितारुप धारण करून प्रभू रामचंद्राना दर्शन दिले, मात्र प्रभू रामचंद्राने माते असे म्हणताच देवीने प्रकटरूप धारण केले आणि श्रीरामाला सीता शुद्धीसाठी पार्वती मातीने (चंडिकामाताने) वरदान दिले आणि म्हणूनच प्रभू रामचंद्राने देवीची स्थापना केली तीच ही राबगावची वरादायिनी माता.



सातव्या शतकात मोहम्मद गझनी यांनी भारतातील संपत्तीच्या आकर्षणामुळे भारतावर १७ वेळा आक्रमण केले व देशातील साधन संपत्ती लुटून नेली. त्यावेळी तत्कालीन आई वरदायिनी देवीचे मंदिरसुद्धा नष्ट केले. तत्कालीन देवळाचा चिरा अद्यापही मंदिराच्या बाहेर आहे. त्यानंतर इ. स. ११९२ मध्ये महंमद घोरीने भारतावर राज्य केले तेव्हापासून मंदिराचा चिरा बाहेर अस्तित्वात होता. त्यानंतर १६व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मंदिराचे जिर्णोद्धार तत्कालीन शिवभक्तांनी केले. तेव्हापासून आई वरदायिनीचे पुरातन मंदिर अस्तित्वात होते.

वरदायिनी देवीच्या मूळ गाभाऱ्यात देवीच्या मूर्तीच्या मागे मूळ स्थान आहे. तसेच मंदिरात गणपती, मरीमाता, शंकर (वरदेश्वर), भैरी -भैरवनाथ या देवतांचे स्थान आहे. नवरात्रोत्सवात देवळामध्ये दररोज आरती, हरिपाठ, भजन, गरबा-दांडिया असे कार्यक्रम अजूनही होतात. चैत्र पौर्णिमेला देवीची यात्रा असते. देवीच्या यात्रेला राबगाव मुळगाव, आदिवासी वाडी व चार ठाकूरवाडी येथील देवाच्या काठ्या येतात. पूर्वी तामसोली, शिलोशी व बलाप या बाजूच्या गावातीलसुद्धा देवाच्या काठ्या येत होत्या, तसेच पूर्वी गळ लावण्याची पद्धत होती, त्याचे अवशेष आजही आपणास पहावयास मिळते. पूर्वी गावात दर तीन वर्षांनी रिंगवणी कार्यक्रम होत होता. त्यावेळी वरदायिनी माता पांढऱ्या घोड्यावर बसून रात्रीच्या वेळी गावात संचार करीत असे व संपूर्ण गावाचे रक्षण करीत असे, अशा प्रकारची आख्यायिका गावातील वयोवृद्ध तपोवृद्ध ग्रामस्थ आजही सांगत आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत कै.जाकू उर्फ जाखू नागू कोळी मयत तर्फे वारस, १)श्री. वासुदेव जाकू कोळी, २) कै. जगन उर्फ जगन्नाथ जाकू कोळी मयत तर्फे वारस i) श्री. रघुनाथ जगन उर्फ जगन्नाथ कोळी उर्फ नाखवा, ii) श्री. भालचंद्र जगन उर्फ जगन्नाथ कोळी उर्फ नाखवा, iii) श्री. प्रभाकर जगन उर्फ जगन्नाथ कोळी उर्फ नाखवा, iv) श्री.रवींद्र जगन उर्फ जगन्नाथ कोळी उर्फ नाखवा,v) श्रीमती. चंपागौरी परशुराम पाटील, ३) कै. महादेव जाकू कोळी मयत तर्फे वारस, i) श्रीमती. मथुराबाई महादेव कोळी, ii) श्री. मंगेश महादेव कोळी, iii) श्री. नरेश महादेव कोळी, iv) श्रीमती. लता गजानन कोळी, ४) कै. हरिश्चंद्र जाकू कोळी मयत तर्फे वारस, i) श्री. भारत हरिश्चंद्र कोळी, ii) श्री. रतन परमानंद नाखवा, ५)कै. जयप्रकाश शिवाजी पाटील मयत तर्फे वारस,i),श्रीमती. विजया जयप्रकाश पाटील, ii) आशिष जयप्रकाश पाटील व iii) सुप्रिया जयप्रकाश पाटील उर्फ सुप्रिया ओंकार पटवर्धन, यांच्या नावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- चाणजे, ता. उरण, जिल्हा. रायगड**

| गट क्रमांक | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ३० | ० | १-१२-८०<br>**पो.ख.** ०-०५-६० | ०९.८७ |
| | | **एकुण** १-१८-४० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/१०/२०२२

**सही/-**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**

**पत्ता :** २०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड
पिन कोड- ४००७०२, मोबाईल नं. ७४०००९७२८६





उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सेक्टर १० येथील बंगाली असोसिएशनच्या दुर्गोत्सवास भेट दिली. आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, सुहास भगत, पी. के. ठाकूर, मंडळाचे चेअरमन देवीप्रसाद मित्रा, अध्यक्ष आनंददीप सेंगुप्ता, उपाध्यक्ष बाप्पादित्य पाऊल, देबालोय मित्रा, तपान मंडल आदी उपस्थित होते.



नवीन पनवेल : जय बजरंग मित्र मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात भाजप सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, ओबीसी मोर्चा युवा अध्यक्ष प्रसाद म्हात्रे, सोशल मीडिया शहर सदस्य सचिन नाझरे यांनी दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे व अॅड. जितेंद्र वाघमारे यांनी त्यांचे स्वागत केले.

# पनवेल ज्येष्ठ नागरिक संघात मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक हृदय दिनाचे औचित्य साधून येथील जेष्ठ नागरिक संघ व खारघरच्या मेडीकव्हर हॉस्पिटलच्या वतीने जेष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर नुकतेच गुरुवारी (दि. २९) संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात इ. सी. जी., लिपिड प्रोफाइल, हाडाची तपासणी, मधुमेह, रक्तदाब, कानाची तपासणी इत्यादी मोफत करण्यात आल्या. शिबिराच्या उद्घाटनावेळी गणेशपूजन व दीप प्रज्वलन संघाचे अध्यक्ष जयवंत गुर्जर, उपाध्यक्षा माधुरी गोसावी, सचिव सुनील खेडेकर यांनी केले. या वेळी अनंत सिंगासने, पत्रकार लेखक दिलीप रेडकर, निला आपटे उपस्थित होत्या. तसेच मेडीकव्हर हॉस्पिटलतर्फे डॉ. प्रांजल, डॉ. राजेन्द्र वाघेला, डॉ. शरीफ, हॉस्पीटलचे जनसंपर्क अधिकारी प्रकाश वाडकर उपस्थित होते. या शिबिरात १२५ ज्येष्ठ नागरिकांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली. हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यास संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, सभासद यांचे तसेच मेडिकवर हॉस्पिटलचे स्टाफ यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

# जासई हायस्कूलमध्ये महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची व जय जवान जय किसान नारा देणारे भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन भारतीय मजदूरसंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस, कामगार नेते सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले तर लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन बाबुराव घरत त्यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयात यशवंत घरत, रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग आदी मान्यवरांच्या उपस्थितीत गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साह विद्यालयात साजरी करण्यात आली.





पनवेल : 'टीआयपीएल'चे माजी व्यवस्थापक अनिल देशमुख यांनी कोपर-गव्हाण येथील जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या नवरात्रोत्सवात भेट दिली. या वेळी त्यांचे गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांच्यासह मंडळातील पदाधिकारी व महिलांनी स्वागत केले.



पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भाजपच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भाजपतर्फे नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून नारीशक्तीचा सन्मान करण्यात येत आहे. त्यानुसार कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील महिलांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. क्रिडा क्षेत्रात अतुलनीय काम केल्याबद्दल ऐश्वर्या श्रीकृष्ण महाडिक, तर शैक्षणिक क्षेत्रात शिक्षिका विद्या चिंतामणी रामतीर्थकर यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका सुशिला घरत आदी उपस्थित होते.

# फडके विद्यालयात सामाजिक भोंडला



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयातील माध्यमिक विभाग मराठी माध्यमातर्फे नवरात्रोत्सवानिमित्त सामाजिक भोंडल्याचे आयोजन करण्यात आले.

पारंपरिक पोशाखातील मुलींनी हत्तीच्या आकृतीभोवती फेर धरत पारंपरिक भोडल्याच्या गाण्यांवर ठेका धरला. समाज व शाळा यांच्यातील अनुबंध अधिक दृढ करण्यासाठी सामाजिक भोंडल्याचे औचित्य साधून कोरोना संकटात विद्यालयातील गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणाऱ्या पालकांना सन्मानित करण्यात आले.

या विद्यालयात शिक्षण घेवून विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांकडून आजी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. पोलीस, अग्निशामक दल, डॉक्टर, परिचारिका, समाजसेविका, विद्यार्थ्यांना बस सेवा देणारे, लघुउद्योजिका, तसेच आर्थिक पाठबळ देणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला, असे या वेळी पर्यवेक्षिका समिता सोमण यांनी सांगितले.











## देवी दर्शन

पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी खुटूकबांधण येथे भाजप युवा मोर्चा खारघर अध्यक्ष विनोद घरत, खारघर शिल्प चौक येथे काशिनाथ पाटील तसेच नितळस, धानसर या ठिकाणच्या देवींचे दर्शन घेतले. आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी शुभ पाटील, हेमंत पाटील, बाळू आदी उपस्थित होते.



जय अंबे नवरात्रोत्सव मंडळ, पाले-उरण



कळंबोली : दुर्गामाता मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात मंडळाचे अध्यक्ष भाजप नेते प्रभाकर घरत व कुटुंबीयांनी देवीची आरती केली.

# उदे गं अंबे उदे!

**दुर्गामाता दौड (माळ सातवी)**

पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दुर्गामाता दौडचे नऊ दिवस आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक उपक्रमाची सातवी माळ रविवारी नावडे येथे गुंफण्यात आली. नावडे गाव मराठी शाळा छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारकापासून दौडला सुरुवात करण्यात आली. यानंतर ग्रामदेवता नावडे कॉलोनीमधून पुन्हा छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारकाच्या इथे येऊन दौडची सांगता करण्यात आली. युवकांसोबतच नागरिक, महिला, लहान मुले दौडमध्ये सहभागी झाल्याचे पहावयास मिळाले.







## दै. रामप्रहर आणि 'द्वारकादास शामकुमार'ची महिलांना सुवर्णसंधी!

आदिशक्तीचा नवत्रोत्सव सध्या सुरू असून देवीचा जागर केला जात आहे. यानिमित्ताने दै. रामप्रहर आणि द्वारकादास शामकुमार, पनवेल (महाराष्ट्राचे महावस्त्र दालन, लग्न बस्त्याचे माहेरघर) महिला वाचकांना साडी जिंकण्याची सुवर्णसंधी देत आहे. दै. रामप्रहरमध्ये प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या एका प्रश्नाचे ४ ऑक्टोबर २०२२पर्यंत अचूक उत्तर देणाऱ्या भाग्यवान महिलेला दसऱ्याच्या दिवशी साडी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**प्रश्नाचे अचूक उत्तर द्या आणि साडी जिंका!**



**प्रश्न : देवीच्या दहा हातांमध्ये काय काय असते?**

*या प्रश्नाचे अचूक उत्तर ७७३८१०६००९ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर नाव व पत्त्यासह ४ ऑक्टोबर २०२२ पर्यंत रात्री ८ वाजेपर्यंत पाठवावे. अनेक महिलांनी बरोबर उत्तर दिल्यास लकी ड्रॉ काढून भाग्यवान विजेती महिला निवडण्यात येईल, याची नोंद घ्यावी. चला तर मग वाट कसली बघता प्रश्नाचे अचूक उत्तर पाठवा आणि साडी जिंका!*






पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळ आयोजित झंकार नवरात्रोत्सवात दिवसेंदिवस गरबारसिकांची गर्दी वाढू लागली आहे. या नवरात्रोत्सवाला शनिवारी रात्री भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी भेट दिली. भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी सोमय्या यांनी गरब्याच्या तालावर ठेका धरला, तसेच रंगमंचावर येऊन ड्रमसेट वाजवण्याचाही आनंद लुटला.























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com